# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यालय विरार (पूर्व)

जावक क्र.वविशम/क्रीडा विभाग/102 /2022-23

दिनांक .02/09/2022

## दरपत्रक

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकरिता इच्छूक व्यक्ती, संस्था, पुरवठादार यांचे कडून खालील बाबी करिता दिनांक. 12/09/2022 रोजी सकाळी 11.00 वाजे पर्यंत सिलबंद दरपत्रक मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र | तपशील | दर | GST | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | वसई विरार शहर महानगरपालिका आयोजित 10 व्या राष्ट्रीय स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे इव्हेंट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणे. | | | |

1. दरपत्रक हे स्वत:चे लेटरपॅडवर सादर करावे.
2. GST प्रमाणपत्र व पॅनकार्ड सोबत जोडणे आवश्यक आहे.
3. महानगरपालिकेत मॅरेथॉन स्पर्धेत 3 वर्षे काम केल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
4. दरपत्रकासोबत कामाच्या 1 टक्के इसारा रक्कम रु. 10,000/- इतकी डिमांडड्राफ्ट सोबत जोडणे आवश्यक आहे.
5. निविदाकाराचे दरपत्रका संदर्भात पत्र व निविदाकाराबाबत संपूर्ण माहिती, कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक नमुद केलेला असणे आवश्यक आहे.
6. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा सोबत जोडणे दरपत्रकासोबत जोडणे बंधनकारक राहील.
7. निविदाधारकास दरपत्रकात नमुद केलेल्या सर्व बाबींचे दर भरणे बंधनकारक राहील.
8. दरपत्रकात नमुद कामाचे दर हे वस्तु / बाबींचे दर, GST असे वेगवेगळे नमुद करावे.
9. दरपत्रकामधील संपुर्ण बाबींचे दर न भरलेली अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.
10. दरपत्राकमधील नमुद बाबींचे दराच्या एकुण रक्कमेवर निविदा स्विकृती करण्यांत येईल.
11. दरपत्रात दर विहित केलेल्या रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात खाडाखोड न करता लिहावेत.
12. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये महापालिकेच्या मुख्यालयात आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
13. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर 2 दिवसात कार्यालयात उपस्थित राहुन करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
14. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेचा राहिल.
15. वरिल अटींचे पालन जे व्यक्ती, संस्था,पुरवठादार करणार नाहीत त्यांना पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
16. सदर कामाची माहिती कार्यालयीन वेळेत दिनांक. 02/09/2022 ते दिनांक.08/09/2022 या कालावधीत क्रीडा विभागा मार्फत उपलब्ध करुन देण्यांत येईल.
17. याकामाची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातुन दिनांक.12/09/2022 रोजी सकाळी 11.00 पर्यंत महापालिकेच्या मुख्यालयातीलआवक-जावक विभागात सादर करावीत.मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दिनांक.12/09/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता मा.उपआयुक्त,क्रीडा विभाग यांचे दालनात उपस्थित दरपत्रकादार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

स्थळ - वसई विरार महानगरपालिका, मुख्यालय, विरार (पूर्व)

दिनांक - 02/09/2022

(वसई विरार शहर महानगरपालिका, जि. पालघर)

सही/-

(शंकर खंदारे)

(उपआयुक्त ,क्रीडा विभाग)

Scanned with CamScanner